# प्रेसनोट

दि. १२/०६/२०२४

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | श्रीरामपूर शहर पो.स्टे., जि.अहमदनगर गुरनं.६११/२०२४ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | श्रीमती संगीता नंदलाल पवार, वय–५३ वर्षे, व्यवसाय नोकरी, मुख्याध्यापिका, सौ. सुभद्राबाई बाबुराव गायकवाड प्राथमिक शाळा, वार्ड नंबर १, श्रीरामपूर, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ५०,०००/– रुपये तडजोडीअंती ४५,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ४५,०००/– रूपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांची पत्नी हया सन २००३ पासुन सौ.सुभद्राबाई बाबुराव गायकवाड प्राथमिक शाळा, वार्ड नंबर १, श्रीरामपुर येथे उप शिक्षक म्हणुन कार्यरत आहेत. सदरची शाळा शासन अनुदानित आहे. तक्रारदार यांचे पत्नीचा सन २०१५ ते २०२२ या कालावधीतील वरिष्ठ वेतन श्रेणीच्या फरकाची रक्कम रुपये १,६२,३६७/– मिळाली आहे. तक्रारदार यांचे पत्नीचे वरिष्ठ वेतन श्रेणीचे फरकाच्या बिलाचे काम करुन देण्यासाठी केलेल्या मदतीच्या मोबदल्यात श्रीमती संगीता नंदलाल पवार, मुख्याध्यापिका,सौ.सुभद्राबाई बाबुराव गायकवाड प्राथमिक शाळा, श्रीरामपूर हया ५०,०००/– रुपये लाचेची मागणी करत असलेबाबतची तक्रार ला.प्र.वि.अहमदनगर कडे दि.१२/६/२०२४ रोजी प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १२/६/२०२४ रोजी सौ.सुभद्राबाई बाबुराव गायकवाड प्राथमिक शाळा, श्रीरामपूर येथे लाच मागणी पडताळणी केली असता यातील आरोपी लोकसेविका पवार यांनी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष ५०,०००/– रुपये लाच मागणी करुन तडजोडीअंती ४५,०००/– रुपये लाच मागणी केली व ती लाच रक्कम स्वीकारण्याचे मान्य केले, त्यानुसार दिनांक १२/६/२०२४ रोजी शंकरराव गायकवाड ग्रामीण एज्युकेशन संस्था श्रीरामपूर संचलित सुभद्रा मुलींचे वसतिगृह, श्रीरामपूर येथे आरोपी लोकसेविका पवार यांचेविरुध्द सापळा लावण्यात आला असता सदर सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेविका पवार यांनी यातील तक्रारदार यांचेकडुन पंचासमक्ष ४५,०००/– रुपये लाच रक्कम स्वीकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदर बाबत आरोपी लोकसेविका पवार यांचेविरुध्द श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर गुरनं.६११/२०२४ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे दि.१२/६/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक :– ९९३०९९७७००

(प्रविण लोखंडे)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, अहमदनगर